# SAMARPAN

## Muilti Disability Rehab Centre Dhule



प्रथमच Multi-Disability Rehab Centre सुरू झाले आहे,
जिथे शारीरिक, मानसिक, बौद्धिक तसेच इतर विकलांग असलेल्या व्यक्तींसाठी
विशेष उपचार व मार्गदर्शन उपलब्ध होईल.
आधुनिक सुविधा, तज्ञ डॉक्टरांचे मार्गदर्शन आणि संपूर्ण पुनर्वसन सेवा येथे मिळणार..
समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी एक महत्त्वाचे पाऊल !

# मासिक अहवाल
# एप्रिल २०२५

Samarpan Multi Disability Rehab Center

Samarpan Multi Disability Rehab Center

Partner Organisation

Rotaract Club of Dhulia
Rotary Club of Dhulia
Rotary Club of Dhule Charitable Foundation Trust
KamalUdwadia Foundation
Matruseva Sangh Trust Dhule
Vidya Vikas Child Neuroclinic



# SAMARPAN

## Muilti Disability Rehab Centre Dhule

## ओळख

समाजातील प्रत्येक घटकाला सन्मानाने जगता यावं, हीच खरी सामाजिक प्रगतीची खूण आहे. याच विचारातून समर्पण मल्टी-डिसॅबिलिटी रिहॅब सेंटर ची स्थापना करण्यात आली आहे. प्रथमच धुळे शहरात अशा प्रकारचे केंद्र सुरू होत आहे जिथे शारीरिक, मानसिक, बौद्धिक तसेच बहुविकलांग व्यक्तींसाठी समर्पित सेवा उपलब्ध होणार आहेत. अत्याधुनिक वैद्यकीय उपकरणे, अनुभवी व तज्ज्ञ डॉक्टरांचे सल्ला, प्रशिक्षित थेरपिस्ट्स व पुनर्वसन तज्ज्ञांच्या सहकार्याने संपूर्ण आणि सातत्यपूर्ण उपचारपद्धती येथे राबवली जाणार आहे.

या केंद्रात फिजिओथेरपी, ऑक्युपेशनल थेरपी, स्पीच थेरपी, मानसोपचार सेवा, काउन्सेलिंग, डे-केअर आणि शैक्षणिक मार्गदर्शन अशी अनेक सेवा एकाच छताखाली देण्यात येणार आहेत. पालकांसाठीही विशेष मार्गदर्शन शिबिरे आयोजित करण्यात येतील जेणेकरून संपूर्ण कुटुंबाला या प्रवासात समाविष्ट करता येईल.

समर्पण हे केवळ उपचार केंद्र नाही, तर एक समाजबदलाची चळवळ आहे – जिथे दिव्यांग व्यक्तींना केवळ मदत मिळत नाही तर त्यांच्यात आत्मभान, आत्मविश्वास आणि समाजात स्वतःचे स्थान निर्माण करण्याची प्रेरणा दिली जाते.

हे केंद्र म्हणजे समाजाच्या सर्वांगीण विकासाच्या दिशेने टाकलेले एक भक्कम पाऊल आहे – समतेचा, समजुतदारीचा आणि सेवाभावाचा संगम.

## सुविधा

- फिजिओथेरपिस्ट
- स्पेशल एज्युकेटर्स
- रेमेडियल एज्युकेशन
- पालक समुपदेशन
- मानसशास्त्रीय मूल्यांकन
- पेडियाट्रिक न्युरोलॉजिस्ट
- सायकोलॉजिस्ट
- स्पीच थेरपिस्ट
- ऑक्युपेशनल थेरपिस्ट
- पालकांचे समुपदेशन



Partner Organisation

Rotaract Club of Dhulia · Rotary Club of Dhulia · Matruseva Sangh Trust Dhule · Rotary Club of Dhule Charitable Foundation Trust · KamalUdwadia Foundation · Vidya Vikas Child Neuroclinic



# SAMARPAN

## Muilti Disability Rehab Centre Dhule

## शुभारंभ

















Samarpan Multi Disability Rehab Center

Partner Organisation

Rotaract Club of Dhulia · Rotary Club of Dhulia · Rotary Club of Dhule Charitable Foundation Trust · KamalUdwadia Foundation · Matruseva Sangh Trust Dhule · Vidya Vikas Child Neuroclinic

# SAMARPAN

## Muilti Disability Rehab Centre Dhule



## एप्रिल महिन्यातील आकडेवारी

| विभाग | बीपीएल सेशन्सची संख्या | इतर सेशन्स | एकूण सेशन्स |
|---|---|---|---|
| फिजिओथेरपी | २८ | १३ | ४१ |
| ऑक्युपेशनल थेरपी | १४ | ५६ | ७० |
| स्पीच थेरपी | २ | ६ | ८ |
| मानसोपचार विभाग | ० | ४ | ४ |
| विशेष शिक्षण | ० | ११ | ११ |
| **एकूण एकत्र सेशन्स** | **४४** | **९०** | **१३४** |



Partner Organisation

Rotaract Club of Dhulia · Rotary Club of Dhulia · Matruseva Sangh Trust Dhule · Rotary Club of Dhule Charitable Foundation Trust · KamalUdwadia Foundation · Vidya Vikas Child Neuroclinic

# SAMARPAN

## Muilti Disability Rehab Centre Dhule



## एप्रिल २०२५ देणगीदार यादी

- डॉ. अमित चौधरी – २२,०००/-
- सौ. वंदना ईश्वरचंद शहा – ५५,०००/-
- अनिल एस. पाटील – ११,०००/-
- इनरव्हील क्लब ऑफ धुळे – १,००,०००/-
- स्वराली राहुल कुलकर्णी – ११,०००/-
- युवराज जी. जैन – २५,०००/-
- साहेबराज जैन – ११,०००/-





Partner Organisation

Rotaract Club of Dhulia · Rotary Club of Dhulia · Matruseva Sangh Trust Dhule · Rotary Club of Dhule Charitable Foundation Trust · KamalUdwadia Foundation · Vidya Vikas Child Neuroclinic



# SAMARPAN

## Muilti Disability Rehab Centre Dhule

## आधारभूत सुविधा विकासाअंतर्गत झालेल्या कामांची माहिती

### एप्रिल महिना

- **आर.ओ. प्लांट आणि वॉटर कूलर यशस्वीपणे बसविण्यात आले. आता सेंटरमध्ये शुद्ध व थंड पिण्याचे पाणी सहज उपलब्ध.**

पिण्याच्या पाण्यासारखी प्राथमिक गरजही अनेकदा विशेष गरज असलेल्या मुलांसाठी कठीण ठरते. समर्पण सेंटरमध्ये दररोज उपचारासाठी येणाऱ्या मुलांचे आरोग्य हेच आमचं सर्वात मोठं दायित्व आहे. याच विचारातून एप्रिल महिन्यात आर.ओ. प्लांट आणि वॉटर कूलर यशस्वीरित्या बसवण्यात आले. आता या मुलांना शुद्ध, थंड आणि सुरक्षित पिण्याचे पाणी मिळत आहे – ही केवळ सुविधा नव्हे, तर त्यांच्यावर असलेल्या आमच्या प्रेमाची आणि काळजीची जाणीव आहे. छोट्या छोट्या गोष्टींतून मोठा बदल घडवणं, हाच ‘समर्पण’चा खरा अर्थ आहे.





### महत्वाचे मुद्दे



- मे महिन्यात EEG मशीनचे इंस्टॉलेशन होणार आहे.
विशेष मुलांच्या मेंदूविकार तपासणीसाठी अत्यावश्यक सुविधा

- सेंटरमध्ये लवकरच ए.सी. इंस्टॉलेशन होणार.
उष्णतेपासून संरक्षण आणि उपचार प्रक्रियेस पोषक वातावरण.

Partner Organisation

Rotaract Club of Dhulia

Rotary Club of Dhulia

Rotary Club of Dhule Charitable Foundation Trust

KamalUdwadia Foundation

Matruseva Sangh Trust Dhule

Vidya Vikas Child Neuroclinic



# SAMARPAN

## Muilti Disability Rehab Centre Dhule

### समर्पण थेरपिस्टसाठी कमल उदवाडिया फाउंडेशनतर्फे प्रशिक्षण कार्यशाळा







क्षमता वृद्धीसाठीच्या आमच्या सततच्या प्रयत्नांचा एक भाग म्हणून, कमल उदवाडिया फाउंडेशनच्या मार्गदर्शनाखाली डॉ. अनिता उदवाडिया हेगडे यांच्या नेतृत्वात मुंबईत तीन दिवसांचे प्रशिक्षण शिबिर आयोजित करण्यात आले.

या प्रशिक्षण कार्यक्रमात फिजिओथेरपिस्ट डॉ. पल्लवी पाटील आणि ऑक्युपेशनल थेरपिस्ट सौ. गीता पांडे यांना डॉ. स्नेहल देशपांडे आणि त्यांच्या टीमने प्रत्यक्ष प्रशिक्षण दिले. त्यांच्या मार्गदर्शनामुळे आमच्या टीमच्या कौशल्यात आणि आत्मविश्वासात लक्षणीय वाढ झाली आहे. त्याचवेळी SRCC चाइल्ड डेव्हलपमेंट सेंटरच्या सहकार्याने सायकोलॉजिस्ट डॉ. प्रियंका गोराणे, स्पीच थेरपिस्ट सौ. स्नेहल चौधरी आणि स्पेशल एज्युकेटर सौ. पल्लवी गवांदे यांना बालकेंद्रित उपचार पद्धतींबाबत सखोल प्रशिक्षण मिळाले.

ही बहुमोल मदत व सहकार्य दिल्याबद्दल सर्व प्रशिक्षक आणि संस्थांचे मनःपूर्वक आभार. त्यांच्या सहकार्यामुळे आम्ही गरजू मुलांसाठीच्या सेवा अधिक प्रभावीपणे देऊ शकतो.

Samarpan Multi Disability Rehab Center

Partner Organisation

Rotaract Club of Dhulia · Rotary Club of Dhulia · Matruseva Sangh Trust Dhule · Rotary Club of Dhule Charitable Foundation Trust · KamalUdwadia Foundation · Vidya Vikas Child Neuroclinic



# SAMARPAN

## Muilti Disability Rehab Centre Dhule




**कमलउदवाडिया फाउंडेशन** च्या वतीने, धुळे येथे सुरू होणाऱ्या या अत्यंत आवश्यक आणि बहुविध पुनर्वसन केंद्राच्या उद्घाटनाबद्दल आम्हाला अत्यंत आनंद होत आहे.

हे केंद्र विशेषतः मुलांसाठी आहे – त्यांना संधी, आधार आणि सक्षम भविष्यासाठी एक दिशा देणारे. आम्ही या केंद्राच्या विकासासाठी आणि भविष्यातील विस्तारासाठी पूर्णतः कटिबद्ध आहोत.

प्रत्येक मुलाला उज्वल भविष्यासाठी एक संधी मिळाली पाहिजे. त्यांची स्वप्ने, त्यांच्या गरजा आणि त्यांच्या क्षमतांना योग्य दिशा देणे हे आपले सामूहिक कर्तव्य आहे. या उपक्रमातून समाजात समावेश, सक्षमीकरण आणि सकारात्मक बदल घडवण्याचा आमचा दृढ संकल्प आहे. मुलांचे हक्क, त्यांचा विकास आणि त्यांना आधार देणारे असे हे केंद्र – हीच खरी सामाजिक गुंतवणूक.

**Dr Anaita Hegde,**
Paediatric Neurologist



Samarpan Multi Disability Rehab Center

Partner Organisation

Rotaract Club of Dhulia District-3060

Rotary Club of Dhulia District-3060

Matruseva Sangh Trust Dhule

Rotary Club of Dhule Charitable Foundation Trust

KamalUdwadia Foundation

Vidya Vikas Child Neuroclinic

# SAMARPAN

## Muilti Disability Rehab Centre Dhule



## Pediatric Neurology & Epilepsy OPD

### उत्तर महाराष्ट्रातील अग्रगण्य बाल मेंदू रोग समर्पित न्यूरोसायन्स सेंटर आता धुळे येथे !

### तुमचं मूल "ऑटिझम" ग्रस्त आहे का ?

काळजी करू नका, आता धुळे जिल्ह्यात
पालकांसाठी एक दिलासादायक सुरुवात...

### तज्ञ सल्ल्यासाठी ओपीडीला या !

वेळ- सकाळी १० ते दुपारी २ वाजेपर्यंत



**डॉ. निखिल पवार**
**Consultant Child Neurologist**

M.D. Pediatrics (Pune)
Fellowship in Pediatric Neurology (Mumbai)
Consultant Pediatric Neurologist & Epileptologist



**७ मे २०२५ रोजी बुधवार**

Scan the QR code to find us easily!

पत्ता - समर्पण मल्टी डिसएबिलिटी रिहॅब सेंटर,कस्तुरबा हॉस्पिटल,
मुख्य टपाल कार्यालयासमोर,
टॉवर बाग शेजारी, धुळे - ४२४००१

अधिक माहितीसाठी संपर्क करा : ८२०८१ ६४९५५ | ९८२३३ २५६६५

For More Information at
www.samarpanrehab.org

Samarpan Multi Disability Rehab Center

Partner Organisation

Rotaract Club of Dhulia

Rotary Club of Dhulia

Rotary Club of Dhule Charitable Foundation Trust

KamalUdwadia Foundation

Matruseva Sangh Trust Dhule

Vidya Vikas Child Neuroclinic



# SAMARPAN

## Muilti Disability Rehab Centre Dhule

# चला, समतेचा आधार देण्यासाठी आजच दान करूया !

प्रत्येक व्यक्तीला सन्मानाने,
आत्मविश्वासाने आणि समान संधींसह जगण्याचा हक्क आहे.
दिव्यांग बांधवांसाठी आपण एकत्र येऊ या
समर्पण केंद्राच्या माध्यमातून त्यांच्या जीवनात आशेचा किरण ठरूया.

QR कोड स्कॅन करून आपण देणगी देऊ शकता...



## दिव्यांग बांधवांसाठी आपण एकत्र येऊया समर्पण केंद्राच्या माध्यमातून त्यांच्या जीवनात आशेचा किरण ठरूया.

For More Information at
www.samarpanrehab.org

Samarpan Multi Disability Rehab Center

Partner Organisation
Rotaract Club of Dhulia District-3060
Rotary Club of Dhulia District-3060
Matruseva Sangh Trust Dhule
Rotary Club of Dhule Charitable Foundation Trust
KamalUdwadia Foundation
Vidya Vikas Child Neuroclinic



# SAMARPAN

## Muilti Disability Rehab Centre Dhule

# चला, समतेचा आधार देण्यासाठी आजच दान करूया !

## Partner Organisation

Rotaract Club of Dhulia District-3060

Rotary Club of Dhulia District-3060

Matruseva Sangh Trust Dhule

Rotary Club of Dhule Charitable Foundation Trust

KamalUdwadia Foundation

Vidya Vikas Child Neuroclinic

## Digital Partner

**Saikala Bahuuddeshiya Sanstha, Dhule**

SAIKALA BAHUDDESHIY SANSTHA

# धन्यवाद

+91 81400 80140

www.samarpanrehab.org

contact.samarpancentre@gmail.com

पत्ता - समर्पण मल्टी डिसएबिलिटी रिहॅब सेंटर,
कस्तुरबा हॉस्पिटल,मुख्य टपाल कार्यालयासमोर,
टॉवर बाग शेजारी, धुळे - ४२४००१

